आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३० नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ओदिशातल्या पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी संबोधित करणार

- संसदेत विरोधी पक्षाच्या मागण्या स्वीकारल्या जात नसल्यामुळे संसदीय लोकशाहीचं पालन होत नसल्याची ज्येष्ठ नेते शरद पवार यांची टीका

- सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम अर्थात यूआयपी अंतर्गत सुमारे ७ कोटी ४३ लाख लाभार्थ्यांची नोंदणी

- फेंगल चक्रीवादळ पुद्दुचेरीजवळच्या कराईकल आणि महाबलीपुरम् किनारपट्टीवर धडकणार; तामिळनाडूत मुसळधार पावसामुळे विमान सेवेवर परिणाम

**आणि**

- सैद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेचा उपांत्य सामना आज लखनौमध्ये होणार, तर मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रिस्तो यांची अंतिम फेरीत धडक

**<><><><><>**

ओदिशातल्या भुवनेश्वर इथं आज आणि उद्या होणाऱ्या पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी संबोधित करणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते

या तीन दिवसीय परिषदेचं उद्घाटन करण्यात आलं. देशातले वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि सुरक्षा प्रशासकांना राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विविध मुद्द्यांवर संवाद तसंच चर्चेसाठी व्यासपीठ निर्माण करून देणं हा या परिषदेचा प्रमुख हेतू आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन कल्पनांना वाव देण्याच्या हेतूनं मुक्त आणि अनौपचारिक चर्चेच्या वातावरणाला प्राधान्य दिल्याचं प्रधानमंत्री कार्यालयानं प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्यासह राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि प्रधानमंत्र्यांचे प्रधान सचिव पी. के. मिश्रा आणि अन्य मान्यवर या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

दहशतवाद तसंच नक्षलवाद, किनारपट्टी सुरक्षा, नवे फौजदारी कायदे आणि अंमली पदार्थ यासह राष्ट्रीय सुरक्षेच्या महत्त्वाच्या विषयांवर या बैठकीत भर देण्यात येत आहे. प्रधानमंत्री काल संध्याकाळी तीन दिवसांच्या ओदिशा दौऱ्यासाठी भुवनेश्वर इथं दाखल झाले आहेत. उल्लेखनीय सेवेसाठी दिले जाणारे राष्ट्रपती पोलीस पदकही या परिषदेत प्रदान करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून दोन दिवसांच्या बिहार दौऱ्यावर आहेत. मधुबनी जिल्ह्यातल्या क्रेडिट आऊटरीच कार्यक्रमात त्या सहभागी होणार आहेत. या दौऱ्यादरम्यान विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांशी त्या संवाद साधतील. दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी त्या स्वयं अर्थसहाय्यता गट, रोजगाराभिमुख योजना आणि अन्य क्षेत्रातल्या

लाभार्थ्यांना एक हजार कोटी रुपयांहून अधिकची ऋण स्वीकृत्री पत्रं वितरित करणार आहेत.

<><><><>

संसदेत विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केलेल्या मागण्या स्वीकारल्या जात नाहीत, याचा अर्थ देशात संसदीय लोकशाहीचं पालन नीट होत नाहीय, अशी टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी  आज पुण्यात वार्ताहरांशी बोलताना केली. हे योग्य नसून यासाठी  लोकांमध्ये जाऊन जागृती घडवून आणण्याची गरज आहे, असं ते म्हणाले. निवडणुकीच्या निकालानंतर लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थता पसरली असून देशात हे प्रथमक घडत असल्याचं पवार म्हणाले. मतदान यंत्राबद्दल काही शंका आहेत, मात्र याबद्दल ठोस पुरावा नाही. काही जणांनी पुनर्मोजणीची मागणी केली  आहे, मात्र आपल्याला यातून काही  निष्पन्न होईल याची आशा नाही असं पवार यांनी सांगितलं.

<><><><>

उत्तरप्रदेशातली संभल इथली घटना तसंच अदानी उद्योगसमूहावरील लाचखो◌ेरी प्रकरण हे गंभीर विषय आहेत, मात्र यावर संसदेत प्रश्न विचारू दिले जात नाहीत, त्यामुळे ही कशाप्रकारची लोकशाही आहे असा प्रश्न पडतो अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना केली. सरकार चर्चेला का घाबरतं असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला.

<><><><>

सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम अर्थात यूआयपी अंतर्गत सुमारे ७ कोटी ४३ लाख लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. गरोदर महिलांना तसंच

नवजात ते १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना १२ प्रकारच्या रोगांसाठी या कार्यक्रमांतर्गत जीवनरक्षक लस देण्यात येते. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. संकेतस्थळावरल्या नोंदीनुसार १ कोटी २६ लाख लसीकरण सत्रं आयोजित करण्यात आली असून सुमारे २७ कोटी ७७ लाख लसीच्या मात्रा देण्यात आल्या आहेत. यूआयपीच्या वार्षिक उद्दिष्टामध्ये सुमारे २ कोटी ९ लाख गर्भवती महिला तसंच २ कोटी ६ लाख अर्भकांचा समावेश आहे, असं पटेल म्हणाल्या. यू विन बद्दल जनजागृती करण्यासाठी मंत्रालयातर्फे व्यापक समाज माध्यम मोहीम देखील राबवण्यात येत आहे.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज अरुणाचल प्रदेशच्या एक दिवसीय दौऱ्यावर आहेत. दोइमुख इथल्या राजीव गांधी विद्यापीठाच्या २२ व्या दीक्षान्त समारंभाचे ते प्रमुख पाहुणे आहेत. या कार्यक्रमानंतर ते इटानगर इथं अरुणाचल प्रदेश विधानसभेच्या विशेष अधिवेशनाला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

नैऋत्य बंगालच्या उपसागरात तयार झालेलं फेंगल चक्रीवादळ आज दुपारपर्यंत उत्तर तामिळनाडू किनारपट्टी ओलांडून पुद्दुचेरीजवळच्या कराईकल आणि महाबलीपुरम् किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. या काळात ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने जोरदार वारे वाहू शकतात. खबरदारीचा उपाय म्हणून किनारपट्टी आणि सखल भागात राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आलं आहे. चेन्नईत होत असलेल्या

मुसळधार पावसामुळं विमान उड्डाणांवर परिणाम झाला आहे. वादळी वारे आणि पावसाचे पाणी साचल्याने विमानतळांवरील सेवा तात्पुरत्या स्थगित करण्यात आल्या आहेत. चेन्नईहून उड्डाण करणाऱ्या आणि चेन्नईला उतरणाऱ्या सहा विमानांचं उड्डाण रद्द करण्यात आलं आहे.

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नौदल आणि तटरक्षक दल सज्ज ठेवण्यात आलं आहे.  किनारीभागात सुमारे ३०० पोलिसांची फौज तैनात आहे. आयटी कर्मचाऱ्यांना घरूनच काम करण्याच्या सूचना आहेत. शाळांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. बांधकाम क्षेत्रं आणि क्रेन सेवा बंद करण्यात आल्या आहेत. सर्व सहा जिल्ह्यातले मोठे फलक हटवण्यात आले आहेत.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनी वादळाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. तिरुवल्लूर, कांचिपुरम, रानीपेट आणि अन्य जिल्ह्यातल्या जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक त्या कार्यवाहीसंदर्भातल्या सूचना देण्यात आल्या असल्याचं स्टालिन यांनी माध्यमांना सांगितलं.

**<><><><><>**

सैद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेचा उपांत्य सामना आज लखनौमध्ये खेळला जाणार आहे.  महिला एकेरीमध्ये ऑलिम्पिक पदक विजेती पी व्ही सिंधु हिचा सामना उन्नती हुडा हिच्याशी होईल. पुरुष एकेरीत लक्ष्य सेनची लढत जपानच्या शोगो ओगवा याच्याशी तर प्रियांशु राजावत याची लढत सिंगापोरच्या जिया हेंग जेसन तेह याच्याशी होणार आहे. काल झालल्या सामन्यात सिंधुने चीनच्या दाई वांग हिचा तर लक्ष्य सेनने मीराबा लुआंग मैसनाम याचा पराभव केला होता.

मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रिस्तो या जोडीनं चीनच्या झोऊ झी होंग आणि योंग जी यी यांचा २१-१६,२१-१५ असा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली आहे.

<><><><>

महाराष्ट्रात नोव्हेंबर महिन्यातच थंडीची तीव्र लाट पसरली आहे. पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये या महिन्यात सर्वाधिक गारवा जाणवत असून जिल्ह्यांमध्ये तापमान दहा अंश सेल्सिअस किंवा त्याहीपेक्षा कमी राहिलं. येत्या तीन दिवसांत काही जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट येईल, असा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. राज्यभरात तापमानात लक्षणीय घट झाल्यानं थंडीचा जोर वाढत आहे. परभणी जिल्ह्यात आठ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागानं केली आहे. विदर्भातही तापमान कमी असून, अमरावती जिल्ह्यात सकाळी बारा अंश सेल्सिअस तर धारणी-चिखलदरा इथं नऊ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मुंबईत काल किमान तापमान सोळा पूर्णांक पाच अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं असून गेल्या आठ वर्षातला हा सर्वात थंड दिवस असल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे.

<><><><>

राजधानी दिल्लीत आजही हवेचा गुणवत्ता स्तर खूप खालावलेला आहे. सकाळी ७ वाजता हवा गुणवत्ता निर्देशांकांची सरासरी ३४८ इतकी नोंदवली गेली. शहराच्या काही भागांत हवा गुणवत्ता निर्देशांकाची पातळी ४०० अंकांवर गेली आहे. पुढचे दोन दिवस दिल्ली आणि एनसीआर भागात

रात्री आणि पहाटेच्या वेळी धुरकं राहील, अशी शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेशातल्या सांची इथल्या 'महान स्तूप' या युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळावर आजपासून दोन दिवसीय महाबोधी महोत्सव सुरू होत आहे. अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू आज संध्याकाळी जंबुद्वीप पार्क इथं आयोजित या महोत्सवाचं उद्घाटन करतील. भगवान बुद्धांचे दोन प्रमुख शिष्य सारीपुत्र आणि मौदगल्यायन यांच्या अस्थींचं पूजन रिजिजू करतील.

**<><><><><>**

बांगलादेश सरकारनं अल्पसंख्याक नागरिकांच्या संरक्षणासाठी आवश्यक ती सर्व पावलं उचलावीत, असं आवाहन भारत सरकारनं केलं आहे. हिंदू आणि इतर अल्पसंख्यांक नागरिकांना दिल्या जाणाऱ्या धमक्या आणि त्यांना लक्ष्य करत त्यांच्यावर होणारे हल्ले, हे मुद्दे भारतानं प्रकर्षानं मांडल्याचं, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल दिल्लीत सांगितलं.

**<><><><><>**

सीरिया मध्ये सशस्त्र दलानं सीरियाचं दुसरं मोठं शहर अलेप्पो ताब्यात घेतलं आहे. इस्लामी दहशतवादी संघटना हयात ताहिर अल शाम आणि त्याच्या सहयोगी गटानं या आधीच तिथल्या आणि इदलिब प्रांतातल्या काही शहरं आणि गावांवर कब्जा केला आहे.

**//<><><><><>//**